महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,**
**प्रादेशिक कार्यालय, रामकृष्ण परमहंस मार्ग, टपाल पेटी क्र.४५६, नाशिक-२.**
दुरध्वनी क्र. ०२५३- २५७७२२० (वै)/(फॅक्स), २५७९४१०/२५७९८८७/२३१६६५७/२३१७०३६ (का.)
Web (www.dvet-ronashik.in) Email- est.ronsk@dvet.gov.in

---

जा.क्र.प्राकाना/आस्था/अ-१/२०२०/८९८ दिनांक : २६/०१/२०२०

**परिपत्रक :-**

विषय :- नियतकालीक बदली २०२० च्या अनुषंगाने बदली प्रक्रिया राबविण्यासाठी निश्चित केलेल्या कालबध्द कार्यक्रमाच्या अनुषंगाने रिक्त पदांची यादी प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.:संकिर्ण-१११११/प्र.क्र.२४/१९/व्यशि-५, दि. १३/१२/२०१९

२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.:संकिर्ण-१११११/प्र.क्र.२४/१९/व्यशि-५, दि. २०/०९/२०१९

३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.:संकिर्ण-१११११/प्र.क्र.२४/१९/व्यशि-५, दि. २७/०९/२०१९

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.:एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ दि. ०९/०४/२०१८

उक्त संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये नियतकालीक बदली प्रक्रिया राबविणेसाठी निश्चित केलेल्या कालबध्द कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार नियतकालीक बदली २०२० करिता या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील जे कर्मचारी दि. ३१-०५-२०२० रोजी एकाच संस्था/कार्यालयामध्ये ६ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी पुर्ण करीत आहे अशा नियतकालीक बदलीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी तसेच गट-ड संवर्गातील विनंती बदलीसाठी रिक्त पदांची यादी यासोबत प्रसिध्द करण्यांत येत आहे. तसेच गट-क संवर्गात ज्या व्यवसाय/ पदांमध्ये बदलीपात्र कर्मचारी नाहीत अशा व्यवसाय/ पदांची यादी यासोबत प्रसिध्द करण्यांत येत आहे.

उक्त शासन निर्णयानुसार दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदर रिक्त पदांच्या यादीमध्ये नियतकालीक बदलीने रिक्त होणारी पदे, दि. ३१/०५/२०२० पर्यंत सेवानिवृत्ती अथवा स्वेच्छा निवृत्तीने रिक्त होणारी पदे व सद्यस्थितीत रिक्त असलेली पदे इ. रिक्त पदांचा समावेश करण्यांत आलेला आहे. तरी सदरची यादी आपले अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या निर्देशनास आणून त्याबाबतची पोच दप्तरी दाखल करावी. तसेच सदर रिक्त पदांमध्ये आपल्या संस्था/ कार्यालयातील रिक्त असलेल्या पदांमध्ये तफावत असल्यास त्याबाबत आवश्यक त्या पुराव्यासह तसे या कार्यालयास तात्काळ अवगत करावे.

सोबत : वरील प्रमाणे.

(पी.एम.वाकडे)
**सहसंचालक**

प्रति, संबंधीत कर्मचारी,

प्रत :- १) मा. संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -१. (कार्यासन क्रं. ४) यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, नाशिक /अहमदनगर /जळगाव /धुळे.

३) प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सर्व

४) प्रकल्प अधिकारी, शासकीय आदिवासी औ.प्र.संस्था, सर्व

५) मुख्याध्यापक, शासकीय तांत्रिक विद्यालय सर्व

६) अंशकालीन प्राचार्य, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र सर्व

७) उप्राचार्य, ए.व्ही.टी.एस., नाशिक.

८) या कार्यालयातील आस्थापना, अ-६ विभाग.

D:\Badli\MASTER DATA 2020\Circulars.doc